Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। बुधवार, दि. ०८ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक ९० । पाने २। Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

बापुसाहेब घोडेस्वार यांना 'आदर्श पत्रकार' पुरस्कार

(पान २ वर)



Selected

### नशिरबाद येथील तरुण चार महिन्यांपासून बेपत्ता

**नशिरबाद** | जळगाव तालुक्यातील नशिरबाद येथील रहिवासी नीरज शिवरामे हा तरुण दि. २१ एप्रिल २०२६ रोजी आपल्या राहत्या घरातून अचानक बेपत्ता झाला असून, गेल्या अनेक दिवसांपासून त्याचा कोणताही ठावठिकाणा लागलेला नाही. त्यामुळे कुटुंबीयांची चिंता वाढली असून त्यांनी नागरिकांकडे मदतीचे आवाहन केले आहे. कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार, नीरज कोणालाही कोणतीही माहिती न देता घरातून निघून गेला. त्यानंतर त्याचा मोबाईलही बंद असून, सर्वत्र शोध घेऊनही त्याचा कोणताही सुगावा लागलेला नाही. नीरजचा शोध लागावा यासाठी कुटुंबीयांनी समाजमाध्यमे आणि वृत्तपत्रांच्या माध्यमातून जनतेला मदतीचे आवाहन केले आहे. नीरजबाबत अचूक माहिती देणाऱ्या किंवा त्याचा शोध लावण्यास मदत करणाऱ्या व्यक्तीस १०,००० रुपयांचे रोख बक्षीस देण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.

## राष्ट्रवादी (शरद पवार) सत्तेत सहभागी होणार?, राजकीय चर्चांवर मुख्यमंत्री फडणवीसांचे स्पष्ट उत्तर

# शरद पवारांचा पक्ष एनडीएमध्ये येणार नाही

## जयंत पाटील–विनोद तावडे भेटीनंतर रंगलेल्या राजकीय चर्चांना पूर्णविराम

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई । महाराष्ट्राच्या राजकारणात आणखी नवा भूकंप घडणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार याच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आगामी काळात सत्तेत सहभागी होण्यासाठी पडद्यामागे मोठ्या घडामोडी सुरु असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे.**

या चर्चा निर्माण होण्यामागे दोन बड्या नेत्यांची भेट कारणीभूत ठरली आहे. शरद पवारांचे विश्वासू नेते जयंत पाटील आणि भाजपचे ज्येष्ठ नेते विनोद तावडे यांची नुकतीच भेट झाल्याचं वृत्त समोर आलं आहे. त्यांच्या या भेटीवरुन शरद पवारांचा पक्ष एनडीएमध्ये सहभागी व्हावा यासाठी हालचारी सुरु असल्याची चर्चा आहे.

या वृत्तावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. राजकीय वर्तुळात सुरु असलेल्या चर्चांनुसार, केंद्र सरकारला मतदारसंघ पुनर्रचना विधेयक संसदेत मंजूर करुन घ्यायचं आहे. याआधी केंद्र सरकारने संसदेचं विशेष अधिवेशन बोलावत हे विधेयक मांडलं होतं. पण हे



विधेयक मान्य होऊ शकलं नव्हतं. त्यामुळे आता केंद्र सरकार पुन्हा हे विधेयक पावसाळी अधिवेशनात मांडण्याची शक्यता आहे.यासाठी भाजपला आणखी खासदारांच्या पाठिंब्याची आवश्यकता आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडे 8 खासदार आहेत. त्यामुळे जयंत पाटील आणि विनोद तावडे यांच्या अनौपचारिक भेटीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

**सुप्रिया सुळे काय म्हणाल्या?**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दोन्ही नेत्यांच्या भेटीवर प्रतिक्रिया दिली आहे.

"दोन्ही नेत्यांनी एकत्रित काम केलं असताना त्यांच्यात पक्षविरहीत मैत्रीचं नातं आहे.

त्यामुळे कदाचित ते भेटले असावेत", असं दत्तात्रय भरणे म्हणाले आहेत. तर खासदार सुप्रिया सुळे यांना याबाबत प्रश्न विचारला असता, "जयंत पाटील आणि विनोद तावडे यांची बैठक कुठे झाली? मला नाही माहिती. मी तुमच्याकडून ऐकत आहे", असं उत्तर त्यानी दिलं.

**वडेट्टीवार यांचं सूचक वक्तव्य**

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी या चर्चांवर सूचक वक्तव्य केलं आहे. "शरद पवारांचा राष्ट्रवादी पक्ष सत्तेत जाणार असल्याच्या चर्चा सुरु आहेत. एवढं मात्र नक्की आहे. आता त्यांना कोणता रस्ता सोयिस्कर असतो, वैचारिक की सत्तेचा?", असं विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं

**रोहित पवार काय म्हणाले?**

दुसरीकडे रोहित पवार यांनी या चर्चा फेटाळल्या. "अशी फक्त चर्चा आहे. त्याला कुठेही तथ्य नाही. तशापद्धतीने ना केंद्रात एनडीएच्या नेत्यांबरोबर, ना महाराष्ट्रात आणि ना काँग्रेसच्या नेत्यांसोबत चर्चा सुरु आहेत", असं रोहित पवारांनी स्पष्ट केलं.

### देवेंद्र फडणवीस नेमकं काय म्हणाले?

यासर्वघडामोडींनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. त्यांनी या चर्चा फेटाळल्या आहेत. "महाराष्ट्रातून NDA मध्ये कुठला नवीन पक्ष येणार नाही. आता जे पक्ष आहेत तेच पक्ष NDA मध्ये राहतील. कुठलाही नवीन पक्ष आता एनडीएमध्ये येण्याची आमची चर्चा नाही", असं देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं. "आम्ही शरद पवारांच्या सोबतच्या कुणालाही तोडण्याचा प्रयत्न करत नाही. जे त्यांच्यासोबत आहेत, शरद पवार यांच्या पक्षात जे आमदार आणि खासदार आहेत, त्यापैकी कुणालाही तोडण्याचा आमचा प्रयत्न नाही", असंही फडणवीसांनी स्पष्ट केलं.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## उपचार नाकारणाऱ्या रुग्णालयांविरोधात कायदा

### मंत्री झिरवळ यांचे आश्वासन

**जन सम्राट टाईम्स**



**मुंबई | प्रतिनिधी:** मुंबईतील ग्लोबल रुग्णालयाने सरकारकडून सवलती आणि अतिरिक्त चटई क्षेत्र घेतल्यानंतरही या रुग्णालयाकडून सर्वसामान्य गरीब रुग्णांसाठी १५ टक्के रुग्णशय्या राखून ठेवल्या जात नाहीत. यासह सर्वच खासगी धर्मादाय रुग्णालयांकडून उपचारासाठी मोठ्या प्रमाणावर शुल्क आकारले जाते. याविरोधात कारवाई करण्याची मागणी विधान परिषदेत सदस्यांनी केली असता रुग्णालयाकडून सरकारने दिलेल्या अटींचे पालन होत नसेल तर त्याची पडताळणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येतील. या रुग्णालयांवर कठोर कारवाई करण्यासाठी कायद्यात तशी तरतूद करण्यात येईल, यासाठी आरोग्यमंत्री, नगरविकास विभाग यांची संयुक्त बैठक घेण्याचे आश्वासन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले. मुंबईतील ग्लोबल रुग्णालयाकडून सरकारने ठरवून दिलेल्या नियमांचे पालन केले जात नसल्याबाबत अनिल परब यांनी तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. धर्मादाय व कॉर्पोरेट रुग्णालयांकडून गरीबांसाठी १५ टक्के रुग्णशय्यांच्या नियमांचे वारंवार उल्लंघन होत असल्यामुळे सरकारकडून कोणती कारवाई करण्यात आली असा सवाल त्यांनी केला. यावर उत्तर देताना मंत्री शंभुराज देसाई यांनी चॅरिटी रुग्णालयांकडून नियमांचे पालन न झाल्यास संबंधित रुग्णालयावर कडक कारवाई करण्यात येईल. जिल्हास्तरावरील समित्यांच्या माध्यमातून विशेष तपासणी मोहीम राबवून डॅशबोर्ड, शासनाच्या आरोग्य योजनांची अंमलबजावणी आणि इतर अटींची काटेकोर पडताळणी केली जाईल. राज्यात प्रत्येक जिल्ह्यात धर्मादाय रुग्णालयांच्या देखरेखीसाठी जिल्हास्तरीय समिती कार्यरत आहे. या समित्यांनी नियमित बैठका घेऊन रुग्णालयांकडून नियमांचे पालन होत आहे की नाही, याची पाहणी करावी. तसेच अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांना सदस्य सचिव म्हणून तातडीने विशेष तपासणी मोहीम राबविण्याच्या सूचना दिल्या .

## तुळजाभवानी मातेची हजारो एकर जमीन लाटली ; जयंत पाटील यांचा गंभीर आरोप

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** राज्य सरकार एकीकडे हिंदुत्वाची भाषा करीत आहे. पण, राज्यातील देवस्थानच्या जमिनी सुरक्षित नाहीत. देवस्थानाच्या इनाम जमिनी खासगी व्यक्तींकडून लाटल्या जात आहेत. कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेला निजामाने ४,१२१ एकर जमिनी इनाम दिली आहेत. त्यापैकी हजारो एकर जमिनी खासगी व्यक्तींच्या ताब्यात आहे. काही जमीन विकली गेली आहे, तर मुख्य न्यासाला माहीत न होताच काही जमिनीवर परस्पर दुसऱ्यांची नावे लावली आहेत, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) जयंत पाटील यांनी विधानसभेत केला. तुळजाभवानी मातेला निजामाने ४,१२१ एकर जमीन दिली आहे. कायद्यानुसार या जमिनीची खरेदी – विक्री होऊ शकत नाही, कुळ कायदा लागू होत नाही. तरीही इनाम जमिनीपैकी हजारो एकर जमीन चार मठांच्या नावाखाली खासगी व्यक्तींच्या ताब्यात आहे. जगदंबा न्यासाच्या नावे असलेली ४०३ एकर जमीन, मुख्य न्यासाला अंधारात ठेवून थेट खासगी व्यक्तींच्या नावे करण्यात आली आहे. कायदा मोडून ६३ एकर



जमीन विकण्यात आली आहे. महसूल विभागाच्या एका अव्वल कारकुनाने २६१ एकर जमीन ७३ खासगी व्यक्तींच्या नावे सात – बारावर नोंदविली आहे. अपशिंगा, उफळा गावातील १५८ एकर जमीन फेरफार करून खासगी व्यक्तींनी लाटल्या आहेत, अशी टीका पाटील यांनी केली.राज्यभर देशवस्थानाच्या जमिनी हडप करण्याचे मोठे रॅकेट कार्यरत आहे. बीड आणि सांगली जिल्ह्यातील हिंदू देवस्थान जमिनीचे विविध प्रकरणे सभागृहाच्या निदर्शनास आणली आहेत. बीड जिल्ह्यातीलच मौजे चिंचेपूर (ता. आष्टी) येथील मशीद व दर्गाह इनाम जमीन सन २०१८ मध्ये एका बनावट खालसा आदेशान्वये बेकायदा लाटण्यात आली.जी जमीन 'खिदमतमास' (सेवेसाठी) असायला हवी होती, ती केवळ कागदोपत्री 'मदतमास' दाखवून तिची बेकायदा हस्तांतराची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. जामखेड (जि. अहिल्यानगर) शहरालगत असलेल्या अत्यंत महत्त्वाच्या इनाम जमिनीचे अकृषिक करून भू-माफियांनी प्लॉटिंग पाडले आणि त्याची कोट्यवधी रुपयांना विक्री केली. आष्टी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला आहे. शासनाने नेमलेल्या विशेष तपास पथकाच्या चौकशीतही मोठा गैरप्रकार उघडकीस आला असून, तब्बल ९५ बनावट खालसा आदेशांचे प्रकरण तपासात निष्पन्न झाले आहे. देवस्थानच्या जमिनी हडप करण्याचे इतके मोठे संघटित रॅकेट चालू असताना, या प्रकरणाची पुन:निरक्षण कार्यवाही अद्यापही विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे प्रलंबित आहे. जिल्हाधिकारी, बीड यांनी पाठविलेल्या पुनरीक्षण यादीतून मौजे चिंचेपूर येथील मशीद व दर्गाहचे नाव जाणीवपूर्वक वगळण्यात आले आहे.

## इम्पिरियल इंटरनॅशनल स्कूलमध्ये विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा झाला 'वन महोत्सव'

**जन सम्राट टाईम्स**


पाळधी प्रतिनिधी : पर्यावरण संरक्षणाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी इम्पिरियल इंटरनॅशनल स्कूल, पाळधी येथे १ ते ४ जुलै २०२६ या कालावधीत 'वन महोत्सव' विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. वृक्षारोपण, ग्रीन डे, पोस्टर मेकिंग, रांगोळी स्पर्धा आणि पर्यावरण जनजागृतीपर पथनाट्य अशा विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांनी हरित भविष्याचा संदेश दिला. वन महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमांची सुरुवात शाळेच्या परिसरात वृक्षारोपणाने झाली.



शाळेचे चेअरमन इंजि. नरेश चौधरी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यानंतर विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही वृक्ष लागवड करून पर्यावरण संवर्धनाची सामूहिक शपथ घेतली. कार्यक्रमादरम्यान आयोजित ग्रीन डे उपक्रमात विद्यार्थ्यांनी हिरव्या रंगाचे वस्त्र परिधान करून निसर्गप्रेमाची भावना व्यक्त केली. तसेच पोस्टर मेकिंग आणि रांगोळी स्पर्धांमध्ये विशेषतः इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनींनी पर्यावरण संरक्षण, जलसंवर्धन, वृक्षांचे महत्त्व आणि हरित जीवनशैली या विषयांवर आकर्षक व संदेशप्रधान कलाकृती सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाट्यातून वृक्षतोडीचे दुष्परिणाम, वाढते प्रदूषण आणि पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी वृक्षसंवर्धनाचे महत्त्व प्रभावीपणे मांडण्यात आले. या सादरीकरणाला विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शाळेचे संचालक जी. डी. पाटील, प्राचार्य आर. एल. माळी, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागामुळे संपूर्ण वन महोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सर्वांनी अधिकाधिक वृक्ष लागवड करण्याचा आणि लावलेल्या वृक्षांचे संगोपन करण्याचा संकल्प केला.

## सरकार अदानीच्या पायावर नतमस्तक होत आहे का ?

### विजय वडेट्टीवार यांचा आरोप



**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी :** सरकारकडून धनदांडग्यांना जमिनी वाटल्या जात आहे. सरकारी भूखंड उद्योगपतींच्या घशात घातले जात आहेत. अदानीला राज्यातील पाच लाख कोटींची जमीन कवडीमोल दराने दिल्या. अदानीला पाहिजे ती जमीन दिली जात आहे. सी- लिंकच्या जमीन पहिल्या निविदाकाराने साडेअकरा हजार कोटी रुपयांना मागितली होती, तीच जमीन अदानीला साडेआठ हजार कोटी रुपयांना दिली. सरकार अदानीच्या पायावर नतमस्तक का होत आहे, असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केला. नागपूरमध्ये वन विभागाची अत्यंत मोक्याची एक हजार एकर जमीन अशीच उद्योगपतीला दिली आहे, त्या जमिनीचा एक रुपयाही सरकारने घेतला नाही.

जेएनपीटीच्या नावाखाली उरण – पनवेल, पेण येथील सरकारी जमिनीची बेकायदा लूट सुरू आहे. सिडको, एसआरझेड, वन विभागाच्या जमिनींवर उद्योगपती, पुढारी, व्यापाऱ्यांनी परस्पर लाटल्या आहेत, असा आरोपही वडेट्टीवार यांनी केला. सिडकोच्या जमिनी अदानीच्या घशात घातल्या जात आहेत. सिडकोची ११,६४२ चौरस मीटरचा भूखंड ऑगस्ट १९७७ मध्ये आयओटीएल कंपनीला भाड्याने दिली होती. कंपनीने जागेचा वापर केला नाही म्हणून पहिल्यांदा २९ कोटींचा दंड लावला, हा दंड कंपनीने भरला. ही जमीन अदानीने घेतली.या काळातील सुमारे ८०० कोटी रुपये भरा, अशी नोटीस सिडकोने अदानीला काढली आहे. ही रक्कम वसूल करू नये म्हणून राजकीय नेत्यांचे पत्र व्यवहार सुरू झाले आहेत. सरकार ही वसुली करणार आहे का, असा प्रश्न विजय वडेट्टीवार यांनी उपस्थित केला.मुंबई – पुणे मिसिंग लिंक बाबत अनेक तक्रारी समोर येत आहेत, संबंधित कंत्राटदारांच्या कामाची चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली. शिर्डीत इंदिरा आवास योजनेतील सुमारे ५० घरे जमीनदोस्त करण्यात आली. संबंधित मुख्याधिकाऱ्यावर तात्काळ कारवाई करा. कोथरूड एसआरए प्रकरण, पिंपरी-चिंचवडमधील टीडीआर घोटाळे आणि बोगस झोपडपट्ट्यांच्या माध्यमातून हजारो कोटींचा गैरव्यवहार झाला आहे, या प्रकरणाचीही स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी केली. सरकारकडून धनदांग्यांना जमिनी वाटल्या जात आहे. सरकारी भूखंड उद्योगपतींच्या घशात घातले जात आहेत.अदानीला पाहिजे ती जमीन दिली जात आहे. सी- लिंकच्या जमीन पहिल्या निविदाकाराने साडेअकरा हजार कोटी रुपयांना मागितली होती, तीच जमीन अदानीला साडेआठ हजार कोटी रुपयांना दिली. सरकार अदानीच्या पायावर नतमस्तक का होत आहे, असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केला.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# 'डॉक्टर-इंजिनिअर बनविण्याची फॅक्टरी' सरकारच्या रडारवर

## दिशाभूल करणाऱ्या जाहिराती क्लासेसना महागात पडणार

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी :** 'डॉक्टर-इंजिनिअर बनविण्याची फॅक्टरी'सारखे अतिशयोक्तीपूर्ण दावे करणाऱ्या महाराष्ट्रातील सर्व कोचिंग क्लासेसच्या जाहिराती आता राज्य सरकारच्या रडारवर असतील. अशा जाहिरातीतून विद्यार्थी-पालकांची दिशाभूल करण्यात येत असल्याचे आढळून आल्यास, त्यांच्यावर अस्तित्वात असलेल्या कायद्याच्या आधारे कारवाई करण्याचे संकेत शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विधान परिषदेत दिले. तसेच खासगी कोचिंग क्लासेसवर नियंत्रण आणणाऱ्या कायद्याचे प्रारूप तयार असून येत्या हिवाळी अधिवेशनानंतर ते मान्यतेकरिता सभागृहात आणण्यात येईल, असेही भुसे यांनी स्पष्ट केले. आमदार मनिषा कायंदे यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून कोचिंग क्लासेसच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर निर्बंध आणण्याची मागणी केली. नीट पेपरफुटी प्रकरणी सध्या मोटेगावकर क्लासेसचे संचालक अटकेत आहेत. या क्लासकडून 'डॉक्टर-इंजिनिअर बनविण्याची फॅक्टरी', अशी जाहिरात केली जात असे. आता या प्रकारचा दावा संदीप अकॅडमीसारख्या एका क्लासकडून सातत्याने जाहिरातीच्या माध्यमातून केला जात आहे, याकडे कायंदे यांनी लक्ष वेधले. त्यावेळी संदीप अकॅडमीबरोबरच सर्वच क्लासेसच्या जाहिराती तपासून त्यांच्याकडून दिशाभूल केली जात असल्यास कारवाईचे संकेत भुसे यांनी दिले. तसेच खासगी कोचिंग



क्लासेसच्या नियमनाकरिता कायदा आणण्यात येणार आहे. त्याकरिता केंद्राने आणि इतर राज्यांनी केलेल्या कायद्यांचा अभ्यास सुरू असल्याची माहिती भुसे यांनी दिली. या कायद्यात भौतिक सुविधा, शुल्क, विद्यार्थी संख्या, अभ्यासाच्या वेळा, जाहिराती, शिक्षकांची पात्रता यांबाबत स्पष्ट नियमावली असेल. न्याय व विधी विभागाच्या मान्यतेनंतर शिक्षक, पालक, अध्यापकांच्या आणि तज्ज्ञांच्या सूचना या प्रारूपावर मागविल्या जातील. त्यानंतर त्याला अंतिम स्वरूप देऊन ते सभागृहात मान्यतेकरिता आणू, अशी माहिती दिली .

महाराष्ट्रातील सर्व कोचिंग क्लासेसच्या जाहिराती आता राज्य सरकारच्या रडारवर असतील. अशा जाहिरातीतून विद्यार्थी-पालकांची दिशाभूल करण्यात येत असल्याचे आढळून आल्यास, त्यांच्यावर अस्तित्वात असलेल्या कायद्याच्या आधारे कारवाई करण्याचे संकेत शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विधान परिषदेत दिले. तसेच खासगी कोचिंग क्लासेसवर नियंत्रण आणणाऱ्या कायद्याचे प्रारूप तयार असून येत्या हिवाळी अधिवेशनानंतर ते मान्यतेकरिता सभागृहात आणण्यात येईल, असेही भुसे यांनी स्पष्ट केले. अनेक खासगी क्लासेसनी सोयीसाठी केवळ अकरावी-बारावीच्या वर्गांना परवानगी घेतली आहे. अशा क्लासेसवर कारवाई केली जाईल, असे इंटिग्रेटेड क्लासेसवर विचारण्यात आलेल्या प्रश्नाला उत्तर देताना भुसे यांनी सांगितले.

### भरारी पथके पाठवून तपासणी

देशभरात जवळपास १३ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या ताणतणावांमुळे आत्महत्या केल्याची माहिती आहे. त्यात १,५०० ते १,८०० विद्यार्थी राज्यातील आहेत. बिहार, दिल्लीने असे कायदे करून आघाडी घेतली. आपल्याकडे हा कायदा कधी येणार, असा प्रश्न चित्रा वाघ यांनी उपस्थित केला. तसेच, क्लासेसवर वचक ठेवण्याकरिता महाविद्यालयांमध्ये बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक करण्याची आणि उपसंचालक कार्यालयांकडून भरारी पथके पाठवून विद्यार्थ्यांच्या हजेरीची तपासणी करण्याची मागणी वाघ यांनी केली. त्यावर अकरावी-बारावीकरिता सीसीटीव्ही, बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक करण्यात आली आहे. तसेच, येत्या काळात भरारी पथके नेमली जातील, अशी माहिती भुसे यांनी दिली.

# खदाणीत बुडून तीन मित्रांचा दुर्दैवी मृत्यू!

## सेल्फी काढताना तोल गेल्याची प्राथमिक माहिती; मित्राला वाचवण्याच्या प्रयत्नात तिघेही बुडाले

जन सम्राट टाईम्स

**मुंबई :** जळगाव जिल्ह्यातील अमळनेर शहरात मंगळवारी सायंकाळी अत्यंत हृदयद्रावक घटना घडली. चोपडा रस्त्यावरील उड्डाणपुलाजवळील पाण्याने भरलेल्या खदाणीत बुडून तीन अल्पवयीन मित्रांचा दुर्दैवी मृत्यू झाला. सेल्फी काढताना झालेल्या अपघातामुळे ही दुर्घटना घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, या घटनेमुळे संपूर्ण अमळनेर शहरावर शोककळा पसरली आहे. या दुर्घटनेत मानव बंटी रतनानी (वय १४), कार्तिक विकी उधवानी (वय १४) आणि दिनेश विजय पंजवानी (वय १७, तिघेही रा. सिंधी कॉलनी, अमळनेर) यांचा मृत्यू झाला. तिघेही जिवलग मित्र असल्याने त्यांच्या एकाचवेळी झालेल्या निधनाने कुटुंबीयांसह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मित्राला वाचवण्याच्या प्रयत्नात तिघेही काळाच्या पडद्याआड प्राथमिक माहितीनुसार, तिघे मित्र सायंकाळच्या सुमारास फिरण्यासाठी चोपडा रोडवरील खदाण परिसरात गेले होते. पावसामुळे खदाणीत मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. पाण्यातून चालत ते एका उंचवट्यावर पोहोचले आणि तेथे मोबाईलवर सेल्फी काढत असताना अचानक एकाचा तोल जाऊन तो खोल पाण्यात पडला. मित्राला बुडताना पाहून दुसऱ्याने त्याला वाचवण्यासाठी हात दिला; मात्र त्याचाही तोल गेला. या दोघांना वाचवण्यासाठी तिसरा मित्र धावला, पण खोल पाण्याचा अंदाज न



आल्याने तोदेखील पाण्यात ओढला गेला. काही क्षणांतच तिघेही सुमारे ३० फूट खोल पाण्यात बुडाले. धाडसी तरुणाची जीवाची पर्वा न करता मदत घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. अमळनेर पोलीस, स्थानिक नागरिक आणि बचाव पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. मात्र खदाणीतील खोल पाणी आणि चिखलामुळे बचावकार्य कठीण झाले होते. यावेळी देवळी येथील धाडसी तरुण दीपक मोरे यांनी कोणतीही पर्वा न करता थेट पाण्यात उडी घेतली. अथक प्रयत्नांनंतर त्यांनी तिन्ही मुलांना बाहेर काढले. मात्र त्यावेळी तिघांचाही मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले.घटनेची बातमी शहरभर वाऱ्यासारखी पसरताच सिंधी कॉलनीसह संपूर्ण अमळनेरमध्ये शोककळा पसरली. घटनास्थळी पोहोचलेल्या कुटुंबीयांनी आपल्या मुलांचे मृतदेह पाहताच एकच आक्रोश केला. परिसरातील नागरिकांनीही या दुर्दैवी घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. पोलिसांनी घटनेची नोंद करून पंचनामा केला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले आहेत. दुर्घटनेचे नेमके कारण आणि सर्व परिस्थितीचा तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. पावसाळ्यात पाण्याने भरलेल्या खदाणी, तलाव आणि धरण परिसरात सेल्फी किंवा पर्यटनासाठी जाणे किती धोकादायक ठरू शकते, याची ही घटना पुन्हा एकदा वेदनादायी आठवण करून देणारी ठरली आहे. प्रशासनाने अशा धोकादायक ठिकाणी नागरिकांनी विशेषतः तरुणांनी जाणे टाळावे आणि पालकांनीही मुलांवर लक्ष ठेवावे, असे आवाहन केले आहे.

### बचाव पथक तातडीने घटनास्थळी दाखल

पाण्यातून चालत ते एका उंचवट्यावर पोहोचले आणि तेथे मोबाईलवर सेल्फी काढत असताना अचानक एकाचा तोल जाऊन तो खोल पाण्यात पडला. मित्राला बुडताना पाहून दुसऱ्याने त्याला वाचवण्यासाठी हात दिला; मात्र त्याचाही तोल गेला. या दोघांना वाचवण्यासाठी तिसरा मित्र धावला, पण खोल पाण्याचा अंदाज न आल्याने तोदेखील पाण्यात ओढला गेला. काही क्षणांतच तिघेही सुमारे ३० फूट खोल पाण्यात बुडाले. धाडसी तरुणाची जीवाची पर्वा न करता मदत घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. अमळनेर पोलीस, स्थानिक नागरिक आणि बचाव पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. मात्र खदाणीतील खोल पाणी आणि चिखलामुळे बचावकार्य कठीण झाले होते. यावेळी देवळी येथील धाडसी तरुण दीपक मोरे यांनी कोणतीही पर्वा न करता थेट पाण्यात उडी घेतली. अथक प्रयत्नांनंतर त्यांनी तिन्ही मुलांना बाहेर काढले. मात्र त्यावेळी तिघांचाही मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले.घटनेची बातमी शहरभर वाऱ्यासारखी पसरताच सिंधी कॉलनीसह संपूर्ण अमळनेरमध्ये शोककळा पसरली. घटनास्थळी पोहोचलेल्या कुटुंबीयांनी आपल्या मुलांचे मृतदेह पाहताच एकच आक्रोश केला. परिसरातील नागरिकांनीही या दुर्दैवी घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. पोलिसांनी घटनेची नोंद करून पंचनामा केला असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले.

---

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# बेवारस दुचाकी मालकांनी दोन महिन्यांत ताबा घ्यावा

## चाळीसगाव पोलीस ठाण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी :** चाळीसगाव रोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध कारवायांदरम्यान जप्त करण्यात आलेल्या तसेच दीर्घकाळापासून बेवारस अवस्थेत पडून असलेल्या मोटारसायकलींची निर्गती करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासाठी संबंधित वाहन मालकांनी पुढील दोन महिन्यांच्या आत मूळ कागदपत्रांसह पोलीस ठाण्यात हजर राहून आपल्या वाहनांची खात्री करून ताबा घ्यावा, असे आवाहन चाळीसगाव रोड पोलिसांनी केले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनेक दुचाकी वाहनांची बेवारस रजिस्टरमध्ये नोंद करण्यात आली असून, संबंधित वाहनांचे उपलब्ध नोंदणी क्रमांक व चेसिस क्रमांकाच्या आधारे मालकांचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. या वाहनांची कायदेशीर निर्गती करणे आवश्यक असल्याने संबंधित मालकांनी तातडीने पुढाकार घ्यावा, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

यासंदर्भातील बेवारस मोटारसायकलींची संपूर्ण यादी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्याच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ज्या नागरिकांची वाहने या यादीत आहेत, त्यांनी वाहनांची मूळ कागदपत्रे घेऊन चाळीसगाव रोड पोलीस स्टेशन, शंभर फुटी रोड, धुळे येथे उपस्थित राहून वाहनांची ओळख पटवावी. पडताळणी पूर्ण झाल्यानंतर आवश्यक अटी व शर्तींची पूर्तता करून संबंधित वाहन मालकांना त्यांची




मोटारसायकल परत दिली जाणार आहे. पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, ही सार्वजनिक सूचना प्रसिद्ध झाल्यानंतर दोन महिन्यांनंतर वाहनांबाबत कोणतीही तक्रार किंवा दावा स्वीकारला जाणार नाही. त्यामुळे संबंधित वाहनधारकांनी वेळ न दवडता आवश्यक कागदपत्रांसह पोलीस ठाण्यात संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी नागरिकांनी चाळीसगाव रोड पोलीस स्टेशन, धुळे येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### वाहनांची ओळख पटवावी

ज्या नागरिकांची वाहने या यादीत आहेत, त्यांनी वाहनांची मूळ कागदपत्रे घेऊन चाळीसगाव रोड पोलीस स्टेशन, शंभर फुटी रोड, धुळे येथे उपस्थित राहून वाहनांची ओळख पटवावी. पडताळणी पूर्ण झाल्यानंतर आवश्यक अटी व शर्तींची पूर्तता करून संबंधित वाहन मालकांना त्यांची मोटारसायकल परत दिली जाणार आहे. पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, सूचना प्रसिद्ध झाल्यानंतर दोन महिन्यांनंतर वाहनांबाबत कोणतीही तक्रार किंवा दावा स्वीकारला जाणार नाही.

---

# निकृष्ट दर्जाच्या रस्त्यामुळे तलाठी कार्यालयासमोर पाण्याचे तळे

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा । प्रतिनिधी :** पाचोरा तालुक्यातील पहान गावात मुख्यमंत्री सहाय्यता निधीअंतर्गत करण्यात आलेल्या रस्त्याच्या कामावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. गावातील प्राथमिक शाळेजवळ नव्याने उभारण्यात आलेल्या तलाठी कार्यालयासमोर पहिल्याच पावसात मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने ठेकेदाराच्या कामाच्या दर्जाबाबत नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, तलाठी कार्यालयासमोरील रस्त्यावर पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी आवश्यक असलेले पाईप न टाकल्यामुळे संपूर्ण परिसरात तळ्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी नागरिक, विद्यार्थी आणि शासकीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या रस्त्याचे काम मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून करण्यात आले असून, संबंधित अंदाजपत्रकात आवश्यक पाईप टाकण्याची तरतूद असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, प्रत्यक्षात ठेकेदाराने कामात मनमानी करत आवश्यक पाईप टाकले नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. याबाबत वारंवार संबंधित ठेकेदाराशी संपर्क साधूनही कोणतीही दखल घेण्यात आलेली नसल्याचे स्थानिकांनी सांगितले. भीमसेनेच्या वतीने जिल्हाध्यक्षांच्या नेतृत्वाखाली पाचोरा तहसील कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच आवश्यक असल्यास रस्ता रोको आंदोलनही छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे. नागरिकांनी या प्रकरणाची चौकशी करून संबंधित कामाची गुणवत्ता तपासावी, दोषी ठेकेदारावर कारवाई करावी आणि रस्त्यावरील पाणी साचण्याची समस्या तातडीने दूर करावी, अशी मागणी शासनाकडे केली आहे.

---

# एसआयआर कामावरून निवडणूक आयोगाचा सावळा गोंधळ; बीएलओ शिक्षकांमध्ये संताप

## काही शिक्षक पूर्णवेळ तर काहींना तीन दिवसच एसआयआरचे काम

जन सम्राट टाईम्स

**मुंबई (प्रतिनिधी):** विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेसाठी बीएलओ (Booth Level Officer) म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षकांना निवडणूक आयोग आणि मुंबई महापालिका प्रशासनाकडून परस्परविरोधी आदेश देण्यात आल्याने शिक्षकांमध्ये तीव्र संभ्रम आणि नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. एकाच कामासाठी काही शिक्षकांना पूर्णवेळ कार्यमुक्त करण्यात आले आहे, तर काहींना आठवड्यातील केवळ शुक्रवार ते रविवार या तीन दिवसांसाठीच एसआयआरचे काम करण्याचे निर्देश देण्यात आल्याने गोंधळ वाढला आहे. मुंबईसह राज्यभर सुरू



असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणावर शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. सुरुवातीला शिक्षकांनी शालेय कामकाज सांभाळून हे काम करायचे असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र, नंतर काही विधानसभा मतदारसंघांतील मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी संबंधित शिक्षकांना पूर्णवेळ कार्यमुक्त करण्याचे आदेश दिले. चांदिवली, घाटकोपर, मानखुर्द-शिवाजीनगर, अणुशक्तीनगर आणि धारावी (अजा) विधानसभा मतदारसंघातील मुख्याध्यापकांना पाठविण्यात आलेल्या आदेशांमध्ये एसआयआरसाठी नियुक्त शिक्षकांना पूर्णवेळ कार्यमुक्त करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, लगतच्या इतर मतदारसंघांमध्ये शिक्षण उपायुक्तांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे झालेल्या बैठकीत सोमवार ते गुरुवार शाळेत अध्यापन आणि शुक्रवार ते रविवार एसआयआरचे काम करण्याचे तोंडी निर्देश दिल्याचे शिक्षकांनी सांगितले. या परस्परविरोधी आदेशांमुळे शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळा प्रशासनात मोठा गोंधळ निर्माण झाला असून शैक्षणिक कामकाजावर त्याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षक भारती संघटनेने या निर्णयाला तीव्र विरोध दर्शविला आहे. संघटनेचे अध्यक्ष विजयकुमार पाटील यांनी शिक्षकांना निवडणुकीच्या कामासाठी दीर्घकाळ शाळेबाहेर पाठविल्यास विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होईल, अशी चिंता व्यक्त केली. अनेक शिक्षक संघटनांनीही एसआयआरचे काम शिक्षकांकडून करून घेण्यास विरोध दर्शविला आहे. सध्या अनेक शाळांमध्ये शिक्षक एसआयआरच्या कामासाठी बाहेर असल्याने विद्यार्थ्यांचे वर्ग प्रभावित होत आहेत.

---

# भुसावळ शहरातील भरवस्तीत गोळीबार

## तरुणावर जीवघेणा हल्ला, पोलिसांकडून विविध अंगांनी तपास सुरू

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ । प्रतिनिधी :** भुसावळ शहरात गेल्या काही दिवसांपासून वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर सोमवारी (६ जुलै) रात्री भरवस्तीत झालेल्या गोळीबाराच्या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे.

दगडी पुल परिसरातील हनुमान मंदिराजवळ अज्ञात हल्लेखोरांनी एका तरुणावर गावठी कट्ट्यातून गोळीबार केल्याची धक्कादायक घटना घडली असून, पोलिसांनी या प्रकरणाचा विविध अंगांनी तपास सुरू केला आहे. प्राथमिक माहितीनुसार, गोलू रायसिंग पंडित हे आपल्या घरासमोरील



ओट्यावर बसलेले असताना दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी त्यांच्यावर अचानक गोळीबार केला. गोळीबारानंतर हल्लेखोरांनी घटनास्थळावरून तात्काळ पळ काढला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये एकच खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच बाजारपेठ पोलीस ठाण्याचे अधिकारी, गुन्हे शाखेचे पथक आणि वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून आवश्यक पुरावे संकलित करण्यास सुरुवात केली आहे.

दरम्यान, परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासून हल्लेखोरांचा शोध घेण्याचे काम सुरू असून, हल्ल्यामागील कारणांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून विविध अंगांनी तपास केला जात आहे. या प्रकरणी बाजारपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, अधिकृत तपासानंतरच गोळीबारामागील नेमके कारण स्पष्ट होणार आहे.

---

# बापुसाहेब घोडेस्वार यांना 'आदर्श पत्रकार' पुरस्कार

## निर्भीड पत्रकारितेची राज्यस्तरावर दखल




जन सम्राट टाईम्स

**जामखेड | प्रतिनिधी :** जामखेड तालुक्यातील साकत गावचे भूमिपुत्र तथा युवा पत्रकार बापुसाहेब रावसाहेब घोडेस्वार यांना पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल राज्यस्तरीय 'आदर्श पत्रकार' पुरस्काराने गौरविण्यात आले. अहिल्यानगर येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते त्यांचा शाल, फेटा, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य यशवंत सेना आणि जय मल्हार शैक्षणिक व सामाजिक संस्था, केडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त हा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून अहिल्यानगर शहराचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम भैया जगताप उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अरणेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य तुळशीराम भोजने होते. तसेच संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल जाडकर, मुख्याध्यापक अशोक सूर्यवंशी, शर्मिलाताई नलवडे, रेश्मा पुणेकर, ज्योती पवार, मच्छिंद्र बीडगर, ज्ञानेश्वर कांबळे, प्रा. आबासाहेब यादव, राजेंद्र पोकळे, शिवदास काळे, शोभाताई विवेक पंडित, साई सागर पंडित, शिवाजीराव वाघ, शहाबुद्दीन शेख, अमोल जाधव, अंकुश जगताप, भास्करराव नेहूल, दिवटे महाराज यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पत्रकार सुनील नजन यांनी सूत्रसंचालन केले.तर अजय जाडकर यांनी आभार प्रदर्शन केले. या सन्मानानंतर बापुसाहेब घोडेस्वार यांच्यावर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील पत्रकारितेच्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत. विशेष : १३ वर्षांच्या पत्रकारितेची राज्यस्तरावर दखल गेल्या १३ वर्षांपासून बापुसाहेब घोडेस्वार यांनी जिल्हा, तालुका आणि ग्रामीण भागातील सामाजिक, शैक्षणिक तसेच जनहिताच्या प्रश्नांवर सत्य, निर्भीड आणि निष्पक्ष पत्रकारिता करत सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने कार्य केले. त्यांच्या या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय 'आदर्श पत्रकार' पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सन्मानामुळे साकत गावासह संपूर्ण जामखेड तालुक्याचा गौरव वाढल्याची भावना व्यक्त होत आहे.

---

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# दोंडाईचा पोलिसांची कारवाई; रेल्वे प्रवाशाला लुटणाऱ्या दोघांना केले जेरबंद

## चाकूचा धाक दाखवून मोबाईल व रोकड लुटली; ९१,६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

जन सम्राट टाईम्स

**दोंडाईचा । प्रतिनिधी:** धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा पोलीस ठाण्याने जबरीचोरीच्या गुन्ह्याचा अवघ्या काही तासांत छडा लावत दोन आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून चोरीचे सहा मोबाईल आणि रोख रक्कम असा एकूण ९१ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून पोलिसांच्या या तातडीच्या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४ जुलै २०२६ रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास परराज्यातील एक प्रवासी दोंडाईचा रेल्वे स्थानकाकडे पायी जात असताना मोबाईलवर बोलत होता. याचवेळी दोन अज्ञात तरुणांनी त्याला अडवून चाकूचा धाक दाखवला. त्यानंतर मारहाण करून त्याच्याकडील मोबाईल आणि रोख रक्कम असा सुमारे २० हजार रुपयांचा ऐवज जबरदस्तीने हिसकावून आरोपी पसार झाले. या घटनेप्रकरणी ५ जुलै रोजी दोंडाईचा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०९(६), ३५१(२)(३) व ३(५) अन्वये जबरीचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.




गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक दिनेश सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाला वेग देण्यात आला. घटनास्थळावरील माहिती, फिर्यादीने दिलेले आरोपींचे वर्णन तसेच गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयित अनिल सुनील सोनवणे (वय २३) आणि उमेश संजय पाटील (वय २०, दोघेही रा. डालडा घरकुल, दोंडाईचा) यांना ताब्यात घेतले. सखोल चौकशीत दोन्ही आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्या ताब्यातून सहा चोरीचे मोबाईल आणि रोख रक्कम असा ९१ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यामुळे केवळ सदर जबरीचोरीच नव्हे, तर इतर चोरीच्या घटनांबाबतही महत्त्वाचे धागेदोरे पोलिसांच्या हाती लागले आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक इमरान खान करीत असून आरोपींकडून आणखी काही गुन्ह्यांची उकल होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत पोलीस निरीक्षक दिनेश सोनवणे, पोउनि इमरान खान, तसेच पोलीस अंमलदार हिरालाल सूर्यवंशी, प्रविण निकुंभे, निलेश हालोरे, निलेश धनगर, योगेश महाजन आणि होमगार्ड अमीन शहा यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. रेल्वे प्रवाशाला लुटणाऱ्या आरोपींना अल्पावधीत अटक करून चोरीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात दोंडाईचा पोलिसांना मिळालेले हे यश गुन्हेगारीविरोधातील त्यांच्या तत्परतेचे आणखी एक उदाहरण ठरले आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306